# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/09/2023 (शनिवार) सकाळ


---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. बेला :– फिर्यादी/पिडीता वय १६ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे अप. क्र. ५४/१६ कलम ३६६, ३७६ (२) (एन) भादंवि सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील पिडीता/फिर्यादी व **आरोपी क्र. १) अनिल हंसराज नेवारे, वय ३२ वर्ष रा. घोटी हे एकमेकांना ओळखत होते. आरोपी क्र. २) आसीफ शेख बब्बु शेख वय ३४ वर्ष रा. बोरी ३) आकाश दिलीप वाघाडे वय २५ वर्ष रा. घोटी ४) योगेश संजय नरड वय ३० वर्ष रा. बेला** यांनी पिडीतेला वेगवेगळया दिवशी वेगवेगळया ठिकाणी नेवुन पिडीतेसोबत जबरी संभोग केला व पिडीतेने कोणालाही काही सांगीतले तर जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव वर्मा यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. एक्स्ट्रा डी. जे. पांडे साो. कोर्टामध्ये सादर केले. दिनांक ०१/०९/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. एक्स्ट्रा डी. जे. पांडे साो. यांनी सदर गुन्हयातील चारही आरोपींना कलम ६ पोक्सो अन्वये प्रत्येकी १० वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/–रू दंड. दंड न भरल्यास ०६ महिणे साधी कैद. कलम ३६६ (अ) भादवि मध्ये प्रत्येकी ०२ वर्ष सश्रम कारावास. व प्रत्येकी २०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ०२ महिणे साधी कैद. कलम ५०६ भादवी मध्ये प्रत्येकी ०३ महिणे सश्रम कारावास व प्रत्येकी ५०० रू दंड, दंड न भरल्यास ०७ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए. पी. पी. परसोडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ/५५५ संजय इंगोले पो.स्टे. बेला यांनी मदत केली आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा गांगापुर शिवार येथे दिनांक ३१/०८/२०२३ चे ०६.०० वा. ते दिनांक ०१/०९/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुहास ईश्वर गिरडकर, वय ३६ वर्ष, रा. गांगापूर वार्ड क्र. ५ उमरेड हे शेतामध्ये हजर होते तेव्हा शेताच्या बाजुला असलेले खाली प्लॉटवर उभी करुन ठेवलेली हेडम्बा मशीन ही तिथेच होती त्यानंतर फिर्यादी सायंकाळी घरी परत आले. दि ३१/०८/२०२३ रोजी फिर्यादीला खाजगी काम असल्याने बाहेरगावी गेले होते. दिनांक ०१/०९/२०२३ रोजी सकाळी ०६/०० वा दरम्यान शेतामध्ये गेले असता खाली प्लॉटवर हेडम्बा मशिन किंमती २,५०,०००/– रु ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना/२१५० पवार मो. नं. ८७८८३८०५९५ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर